# अभिरुची

**मराठी मंडळ सॅक्रामेंटोचे त्रैमासिक मुखपत्र.**

- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक व मंडळाकडे राहतील.

# २०१७ अंक #१

## या अंकात


| | |
|---|---|
| संपादकीय | मीनल जोशी |
| कार्यकारिणीचे मनोगत | प्राची जेजुरीकर |
| २०१७ कार्यकारिणी परिचय | २०१७ कार्यकारिणी |
| सागरातील स्वर्ग | अरविंद साने |
| मँगो फ्रोयो | केतकी जोशी |
| आम्रखंड | रेणू रानडे |
| पियुष | पल्लवी सावंत |
| संतांची महती - श्री संत तुकाराम महाराज | कुमार कुलकर्णी |
| मैदानी खेळ | कुमार कुलकर्णी |
| Maharaja Shivaji | अजित नातू |
| मराठी शाळा अहवाल | अमिता खरे,पल्लवी सावंत |
| पुनर्जन्मावरील असलेला भारतीयांचा पूर्ण विश्वास | अरविंद साने |
| अभिप्रेरणा – चालना | अरविंद साने |
| आगामी कार्यक्रमांचे कॅलेंडर | कार्यकारिणी |
| मागील कार्यक्रमांची प्रकाशचित्रे | कार्यकारिणी |

# संपादकीय

२०१७ सालचा हा पहिला वहिला " अभिरुची" या आपल्या त्रैमासिकाचा अंक आज आपल्या हाती सुपुर्त करताना विशेष आनंद होतो आहे. तुम्हा सगळ्यांना मराठी नववर्षाच्या अनेक हार्दिक शुभेच्छा!

या अंकात सर्वप्रथम मी आपल्या २०१७-१८ च्या नवीन कार्यकारिणीचे स्वागत करते आणि त्याचबरोबर २०१६-१७च्या समितीचे आभार मानून त्यांना निरोप देते. सर्वार्थाने दैदिप्यमान असे २०१६ चे वर्ष आपल्या मंडळासाठी ठरले. वर्षभर एकसे एक दर्जेदार कार्यक्रम आपल्यापुढे आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणाऱ्या या २०१६-१७ च्या समितीचे पुन्हा एकदा मनःपूर्वक आभार!

त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून नवीन वर्षाची धुरा सांभाळण्यासाठी नवीन समिती सज्ज झाली आणि गेल्या २-३ महिन्यांत त्यांनी पुन्हा एकदा जोरदार कार्यक्रमांनी सुरूवात करून "हम भी तो कम नही" हे दाखवले आहेच. २०१७-१८ च्या या नवीन कार्यकारिणीचे हार्दिक स्वागत आणि त्यांना वर्षभरातील पुढील कार्यक्रमांसाठी अनेक शुभेच्छा!

या अंकात सुरुवातीला आपण ओळख करून घेणार आहोत आपल्या नवीन कार्यकारिणीतील सदस्यांची त्यांच्याच शब्दात! त्याचप्रमाणे मंडळाच्या कार्यक्रमांचा आढावा तसेच माहिती देत आहेत मंडळाच्या सचिव प्राची जेजुरीकर.

लवकरच आता आपल्या इथे उन्हाळ्याला सुरुवात होते आहे. त्यामुळे यावेळचा आपला " अभिरुची" चा हा अंक "उन्हाळा" विशेषांक आहे. उन्हाळा म्हटलं की आठवतो तो शब्द म्हणजे "उन्हाळ्याची सुटी" आणि सुटी म्हटलं की मनात विचार घोळू लागतात ते फिरायला जाण्याचे, पर्यटन स्थळांचे. अश्याच दोन पर्यटन स्थळांबद्दल - मॉरिशस आणि सेशल्स बद्दल माहिती दिली आहे श्रीयुत अरविंद साने काका यांनी.

"उन्हाळा " म्हणताच अगदी सहजतेने मनात आणखी एक शब्द येतो तो म्हणजे "आंबा"

आंब्याच्या फोडी, आंब्याचा रस खाण्यापासून ते आंब्यापासून केलेल्या असंख्य पदार्थांची चंगळ असते उन्हाळ्यात! त्याचप्रमाणे आठवतात कैरी, जांभळं, करवंदं , पन्हं, कोकम सरबत, लिंबू सरबत आणि कितीतरी मस्त थंडगार ,

गारेगार पदार्थ! तर अश्याच काही खास उन्हाळी पाक़कृती तुमच्यासाठी या अंकात दिल्या आहेत - रेणू रानडे, केतकी जोशी आणि पल्लवी सावंत यांनी. तुम्ही त्या पाककृती करून बघायला विसरू नका!

यावर्षी पासून आपल्या मंडळातील एक ज्येष्ठ सदस्य श्रीयुत कुमार कुलकर्णी काका यांनी खास मुलांसाठी एक लेखमाला लिहायला सुरुवात केली आहे. या लेखमालेतून ते आपल्याला महाराष्ट्रातील विविध संतांची ओळख, त्यांचे कार्य याची माहिती देणार आहेत. आपण सगळे महाराष्ट्राच्या मातीत वाढलो त्यामुळे आपल्याला या सगळ्यांची महती माहिती आहेच परंतु आपल्या इथे अमेरिकेत वाढणाऱ्या नवीन पिढीपर्यंत ही माहिती पोचावी या हेतूने काकांनी ही लेखमाला चालू केली आहे, तेव्हा मी पालकांना खास विनंती करते की, तुम्ही जरूर तुमच्या मुलांना हा लेख वाचून दाखववावा.

सध्याच्या स्मार्टफोन, व्हिडीओ गेम्स या अश्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या भाऊगर्दीने आपले जीवन व्यापून टाकले आहे. अर्थातच बदलत्या काळाप्रमाणे पावले टाकत चालताना ही उपकरणे जणू आपल्या जीवनाचा आविर्भाज्य भाग बनली आहेत. मग त्याला ही नवीन पिढी तरी कशी अपवाद राहील? परंतु यासगळ्याबरोबर शरीराला शुद्ध हवेची, व्यायामाची , मोकळ्या हवेत मैदानी खेळ खेळण्याची देखील कशी गरज आहे आणि त्यासाठी मुलांनी काय केले पाहिजे हे अगदी सहजरित्या श्रीयुत कुमार कुलकर्णी काकांनी त्यांच्या लेखात मांडले आहे. हा लेख अगदी नक्की वाचा.

यंदाच्या "अभिरुची" मध्ये आपण आणखी एक लेखमाला चालू करतोय. महाराष्ट्राचं दैवत असणारे म्हणजे आपले सर्वांचे शिवाजी महाराज! त्यांच्या कार्याची, स्वराज्याच्या लढ्याची, रोमहर्षक लढायांची मुलांना ओळख व्हावी आणि शिवरायांचं कार्य त्यांच्यापर्यंत पोचावं म्हणून श्रीयुत अजित नातू यांनी शिवरायांबद्दल मुद्दाम इंग्रजीतून लेख लिहिला आहे. तुम्ही तुमच्या मुलांना हा लेख नक्कीच वाचायला द्या.

सॅक्रामेंटो मराठी शाळेचा अहवाल सादर केला आहे शाळा संचालिका अमिता खरे व पल्लवी सावंत यांनी.

त्याचप्रमाणे या अंकात आहे मंडळाच्या वर्षभराच्या कार्यक्रमांची सूची, मागील काही कार्यक्रमांच्या प्रकाशचित्रांचे दुवे, तसेच आगामी कार्यक्रमाची माहिती!

असा हा भरगच्च अंक तुम्हाला कसा वाटला हे आमच्यापर्यंत नक्की पोचवा! तुम्हाला अंकात काही बदल, सुधारणा करावयाशा वाटत असतील, काही सुचवण्या असतील तर जरूर कळवा. त्याचप्रमाणे तुम्हाला जर अंकात काही लेख, साहित्य, प्रकाशचित्रे, पाककृती द्यायची असतील तर आम्हाला नक्की पाठवा. संपर्कासाठी ईमेल पत्ता आहे: committee@mmsac.org

जाता जाता , या अंकासाठी साहित्य पाठवलेल्या सगळ्यांचे मनापासून आभार! त्याचप्रमाणे श्री. कुमार कुलकर्णी काकांनी लेखांच्या मुद्रितशोधनासाठी मदत केल्याबद्दल त्यांना अनेक धन्यवाद!

आपली स्नेहांकित



**मीनल जोशी**

**(संपादक, अभिरुची त्रैमासिक, mmsac)**

**Meenalj29@gmail.com**

# कार्यकारिणीचे मनोगत

नमस्कार मंडळी,

ह्या वर्षाचा ‘अभिरुची’ चा पहिलाच अंक सादर करायला आम्हाला आनंद होतो आहे! ह्या अंकामध्ये मराठी मंडळाच्या कार्यक्रमांचे कॅलेंडर आणि कार्यकारणीचा परिचय अंतर्भाव करण्यात आला आहे.

फेब्रुवारी २०१७ –जानेवारी २०१८ च्या कार्यकारणीची थोडक्यात ओळख : अमित करमाळकर ( अध्यक्ष), वंदिता भक्ता ( कोषाध्यक्ष ), पूनम जाधव ( उप-कोषाध्यक्ष), प्राची जेजुरिकर( सचिव), संदीप बिडये ( उप- सचिव). ह्याशिवाय, विक्रम बोबडे ( facebook ), विक्रांत सावंत ( website ), पल्लवी सावंत ( Camping) , मीनल जोशी ( संपादक- "अभिरुची") निलेश भिसे ( IAS representative) आम्हाला मदतीला आहेत.

२०१७ च्या कार्यक्रमांची दमदार सुरवात आपण "रंगपंचमी" ने केली. तुम्ही सर्वांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहून धमाल केली. ह्यावर्षी प्रथमच होळी/ रंगपंचमी च्या कार्यक्रमाला १८० लोक उपस्थित होते!

गुढीपाडव्याचा एकांकिकांचा कार्यक्रम मात्र आम्हाला कलाकारांना visa वेळेत न मिळाल्यामुळे रद्द करावा लागला. ह्यामध्ये तुमचा हिरमोड झाला तरीही कोणीही तक्रार न करता परिस्थिती समजून घेतली ह्याबद्दल मी मंडळातर्फे तुमचे मनापासून आभार मानते.

नुकतचं आपण ‘तीन पायांची शर्यत’ हे पुरस्कार विजेते नाटक बघितलतं आणि नाटकातील कलाकारांबरोबर फोटो काढण्याची संधीदेखील आपल्याला मिळाली. ह्या नाटकाची ध्वनी आणि प्रकाशयोजानेसकट तांत्रिक बाजू खूप महत्त्वाची असल्यामुळे नाटक Rocklin येथील अनुरूप अश्या नाट्यगृहात ठेवण्यात आले होते. ह्या नाटकाला तुम्ही उत्तम प्रतिसाद दिलात त्याबद्दल धन्यवाद!

आता २ जून ला आपल्याकडे येताहेत सलील कुलकर्णी. ‘माझे जगणे होते गाणे’ हा गाणी, फर्माईश आणि गप्पांचा कार्यक्रम आहे. ह्या सांगितिक मेजवानीचा आस्वाद घ्यायला आपण साऱ्यांनी लवकरात लवकर तिकिटे विकत घावी .

दरवर्षी प्रमाणेच हे वर्षही भरगच्च आणि दर्जेदार कार्यक्रमांचे आहे. तेव्हा तुम्ही सर्वांनी सगळ्या कार्यक्रमांना मोठ्या संखेत उपस्थित राहावे आणि लवकरात लवकर RSVP /तिकिटे विकत घ्यावी, ही विनंती.

एका कार्यक्रमाची तिकिटे विकत असतांनाच आम्ही दुसऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करत असतो. आपण लवकरात लवकर तिकिटे विकत घेतल्यामुळे आम्हाला त्यासाठी खूप मदत होते. तसेच आपले कार्यक्रम वेळेत सुरु करण्याचा आमचा प्रयत्न असतो, त्यासाठी आपल्या सगळ्यांची वेळेत उपस्थिती महत्त्वाची!

आपल्या मंडळासाठी तुम्हाला मदतनीस/ स्वयंसेवकाचे काम करण्याची इच्छा असल्यास आम्हाला जरूर कळवावे. तुमच्या मदतीची आणि प्रोत्साहनाची आम्हाला नेहमीच गरज असते!

चला तर मग, भेटूयात!

कळावे,

प्राची जेजुरीकर


Century 21
SELECT REAL ESTATE
6300 Florin Rd
Sacramento, CA 95823
Office: 916-394-8705
Direct: 916-695-7703
eFax: 916-394-8805
lpokle@c21selectgroup.com
laxmikant.pokle.c21selectgroup.com
MLS
Laxmikant Pokle
Realtor®
CaBRE #01986685
Each office is independently owned and operated


mithai4all
Your Shop Away From Home
Celebrate Diwali with Mithai4all
Send mithai gifts to your
parents, friends & relatives in India.
Order mithai online & get it home delivered
We also deliver to US, UK, Canada,
Singapore, Australia and 10+ countries

# २०१७-१८ कार्यकारिणी परिचय

**Amit Karmalkar( President)** :- Wish you all happy New Year and Thank you for giving me this opportunity to represent Sacramento Marathi Mandal. I am  new to sacramento area and fortune to  meet community people. I lives in Folsom with my wife Kapila and two sons Abhinav (6)and Vedant (2). Myself as President of this group and along with entire Team (Poonam, Prachi, Vandita and Sandip) are committed to bring new events to our members and Community. we need all of your support and blessing  to make it successful 2017 MMSAC.



**Prachi Jejurikar( Secretary):** Namaskar, This is my first time as a committee member. I am an Instrumentation Engineer and I have done my Masters in Marketing Management. I am a stay at home mom, and live in Folsom with my loving husband Prashant and two wonderful kids: Gargi is a 4th grader and Arnav is a preschooler.

We are an outdoorsy, nature-loving family and love staying in the Folsom area. This year I have got an opportunity to serve you as the Secretary of MMSAC and I'm looking forward to the journey!



**Vandita Bakta( Treasurer):** First of all, I would like to thank you all for giving me the opportunity to serve on the Committee this year. I've been living in Sacramento with my husband Vinay Shenoy and two kids Rhea and Shika for the past 16 years and have been part of MMSAC for the past 5 years. I enjoy being part of the Committee and organizing cultural events. It's been couple of weeks since I started working with the new committee members and I'm loving it! I have a very social and outgoing personality and I love being part of Community that supports and promotes local talent and provides an opportunity for people with common value and beliefs to come together and be a part of MMSAC. Hats off to the previous committee for all their hard work and dedication and we hope to follow their footsteps while creating our own legacy.



**Sandip Bidaye( Jt Secretary)**: Living in Roseville/Rocklin area since 2002 with my wife Prasanna and three kids.

Our elder son Aaryan is a 5th grader, who enjoys music and our kindergartener twin boys enjoy just being avengers fighting each other.

I am working for Hewlett Packard Enterprise in Roseville as an embedded software engineer.

I personally enjoy reading Marathi books, playing keyboard (not computer) and carrom. I enjoy watching Marathi plays a lot and have taken part in a few during my school days back in Mumbai.

I started my association with MMSAC since 2011 and mostly as a passive participant. However, that changed last year when MMSAC decided to bring a Marathi play to Sacramento. I really enjoyed the experience of working with all MMSAC family members during that event. So, this year I decided to join the MMSAC committee as a joint secretary and make many more long term friendships. I am really looking forward to enjoy participating in various exciting event MMSAC is planning to bring this year :)



**Poonam Jadhav( Jt. Treasurer):** Living in Roseville since 2011 with Umesh and two kids – Abhishek, who is a freshman in undergrad and Pooja, who is a freshman in high school. I am a Ayurvedic Doctor by education and house wife by profession. Sacramento is a home away from home for me as this is the city where I started my journey in US in 1995. I have been actively taking part in cultural activities from my school days and had the opportunity to continue that hobby in two of my other homes in US – Los Angeles and Michigan. I have previously enjoyed the opportunity to serve you as a treasurer for MMSAC in 2012, 2013and 2016. I enjoy being part of a community that supports forums such as MMSAC who provide a platform for all generations to come together and preserve/demonstrate/cultivate our culture and build long term friendships that create a sense of belonging



# सागरातील स्वर्ग

**'सेशल्स व मॉरिशस'**

१९८३ ते १९८८ या कालावधीत बँकेतर्फे उगांडामध्ये कामासाठी वास्तव्य करत असताना आफ्रिका खंडाच्या पूर्वेस थोडेसे दक्षिणेच्या बाजूला हिंदी महासागरात असलेले सेशल्स , मॉरिशसला जाण्यासाठी मन फार इच्छा करत होते. त्यावेळी या बेटांच्या समुहाबद्दल खूप ऐकले होते. समुद्र , निसर्ग, रंगीबेरंगी माशांचे जग, याबद्दल खूप कुतूहल वाटत होते. त्यावेळी जमले नाही,पण हा योग पुढे बँकेमुळेच १९९८ साली घडून आला. १५ दिवसांसाठी या प्रदेशात काम व मनसोक्त भटकणे झाले. स्वच्छ सुंदर समुद्रकिनारा, निळाशार पारदर्शी समुद्र, प्रदुषणमुक्त वातावरण, मऊमऊ पांढरी गुळगुळीत वाळू, समुद्रकिनार्याला लागून असणारे लहान लहान डोंगर व त्यावरून गेलेले उंचसखल वळणावळणाचे रस्ते, समुद्रातील रंगीबेरंगी जलचर, प्रवाळ, शेवाळ, व खडक, गर्द झाडी, लहान लहान बेटे या सर्वांमुळे पृथ्वीवरील महासागरातील स्वर्गच वाटावा असा हा प्रदेश आहे. प्रदेश कसला म्हणा! छोट्या छोट्या १०० ते ११० बेटांचा समूह. त्याला ओळखला जाणारा हा देश म्हणजे सेशल्स. हिंदी महासगरात असलेली ही बेटे जगातील पर्यटकांचे आकर्षण होऊन गेली आहेत. 'प्रत्येक क्षण म्हणजे आनंदाचा ठेवा' असा या देशाचा मूलमंत्र होऊन बसला आहे. विमान वाहतुकीच्या आधुनिक व प्रगत सोयी यामुळे जग जवळ येऊन स्पूर्ण जगभरातून येथे येणार्या पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढतेच आहे.

सेशलसचा इतिहास फारसा जुना नाही. २०० वर्षांपूर्वी ही बेटे खर्या अर्थाने जगाला माहिती झाली. इ.स. १५०३ साली वास्को द गामा भारतातून परत जाताना या बेटांवर उतरला होता. इ.स. १५०६ साली आणखी एक पोर्तुगीज खलाशी फर्नाओ सोअर्स याच्या नजरेला ही बेटे पडली होती. इ.स. १६०८ साली ब्रिटीश इंडिया कंपनीच्या प्रवासात इंग्रजांचे पाऊल 'माहे' या मुख्य बेटावर पडले. इ.स. १७४२ साली फ्रेंच येथे आले. इ.स. १७५६ मध्ये फ्रेंचांनी या बेटावर ताबा मिळवला आणि त्यांच्या मॉरिशस कॉलनीचा एक भाग म्हणून या बेटांचा कारभार पाहू लागले. पुढे इ.स. १८१४ च्या पॅरिसच्या तहानुसार ब्रिटीशांनी या बेटांवर हक्क संपादन केला. फ्रेंचाच्या काळातच मॉरिशचा गव्हर्नर श्री. माहे याचे नाव प्रमुख बेटाला देण्यात आले. फ्रेंचांनी कदाचित फ्रान्सच्या अर्थतज्ज्ञ सेशल्सचे नाव या बेटांच्या समुहास दिले असावे. 'सेशल्स'चा दुसरा अर्थ 'सहा बहिणी' असाही होतो. बहुदा प्रतहम दर्शनी दिसणार्या सहा बेटांमुळेही हे नाव पडले असावे. नंतरच्या काळात इ.स. १७६८ ते १७७२ या अवधीत प्राले ला डिंगो इत्यादी अनेक जवळची बेटे फ्रेंचाच्या नजरेस पडली. इ.स. १९०३ साली मॉरिशसपासून स्वतंत्र होऊन हा बेटांचा समूह 'सेशल्स' अशी फ्रेंचांची वेगळी वसाहत म्हणून ओळखली गेली. विसाव्या शतकामधील दोनही जागतिक युद्धांचा सेशल्सवर फारसा परिणाम झाला नाही. २९ जून १९७६ रोजी वसाहत राज्य संपुष्टात येऊन सेशल्स स्वतंत्र झाले. इ.स. १९९३ मध्ये सार्वजनिक

निवडणुका होऊन तेव्हापासून लोकनियुक्त सरकार देशाचा कारभार पहात आहे. २७ वर्षे सलग अधिकार गाजवलेल्या राष्ट्राध्यक्ष श्री. रेने याने एप्रिल २००४ मध्ये आपण होऊन खुर्ची खाली करून उपराष्ट्राध्यक्ष जेम्स मिचेल याच्याकडे अधिकार सुपूर्त केले.

सेशल्सची आजची लोकसंख्या फक्त ८०,००० आहे. सेशल्सचे लोक फ्रेम्च, आफ्रिकेमधून आणलेले गुलाम, इंग्रज तसेच भारतीय व चिनी व्यापारी यांच्या मिश्रणातून तयार झालेले आहेत. या बहुजातीय व बहुदेशीय समाजात त्या त्या जाती जमातीचे संस्कार, आचार, राहणी,खाणे, वृत्ती यांचे मिश्र दर्शन देऊन जाते. फ्रेंच भाषेतून व इंग्रजीच्या सहाय्याने निर्माण झालेली सेशल्सची क्रिओल ही भाषा आहे. त्याच्या बरोबरीने फ्रेंच व इंग्रजी भाषासुद्धा वापरात आहेच. सेशलसचा माणूस कधीच घाईत नसतो. त्याला गप्पा मारायला, हसायला भरपूर वेळ असतो. त्याची रहाणी आनंदी व मुक्त होऊन जगण्याची बनली आहे. ऑफीसेस, सरकारी व खाजगी बँका,विमान कंपन्या इ. ठिकाणी नोकरीवर स्त्रीवर्गच जास्त आहे. पुरुषवर्ग मुख्यत्वे मासेमारी व थोडीफार शेतीयात आहे. पर्यटनामुळे येथील प्रमुख व्यवसाय हॉटेलचा आहे. तिथेही स्त्रियाच प्रामुख्याने असतात. सेशल्सच्या लोकांचे दिसणे कसे आहे म्हणून विचारले तर वर्णन करणे अवघड आहे. कारण तीन चार देशांच्या मिश्रणातून ही जनता निर्माण झाली आहे.  रंगाने ते गोरे, काळे किंवा सावळेही असू शकतात. त्यांचे केस सोनेरी, काळे, किंवा भुरे असतात. त्यांच्या डोळ्यांचे रंग काळे, निळे, तपकिरी किंवा घारे आढळतात, परंतु सर्वात सामाईक असलेली गोष्ट म्हणजे त्यांचा आनंदी , मोकळा,

पापभिरू स्वभाव, दुसर्याला मदत करण्याची तत्पर वृत्ती. कदाचित या गुणांमुळेही निसर्गाबरोबरच त्यांच्या देशात पर्यटक आकर्षित होत असावेत.

या १०० ते ११० बेटांच्या समूहाचे एकूण जमिनीचे क्षेत्रफळ ४५५ स्क्वेअर किलोमीटर असून त्यांना एकूण समुद्रकिनारा ४९१ किलो मीटर एवढा लाभला आहे. या बेटांमधील मुख्य बेट म्हणजे माहे होय. हे सर्वात महत्त्वाचे असलेले बेटसुद्धा आकाराने फार मोठे नाही. साधारण १५५ स्क्वेअर किमी आकाराचे हे बेट २७ किमी उत्तर-दक्षिण व ७ किलोमीटर पूर्व्य -पश्चिम हा त्याचा विस्तार आहे. त्याच बेटावर व्हिक्टोरिया हे राजधानीचे ठिकाण आहे. माहे या बेटाला जगातील सर्वात सुंदर , निसर्गरम्य बेट म्हणता येईल.. या एका लहानशा बेटावर जवळ जवळ ७० बीच आहेत. एक बीच दुसर्यासारखा नाही. वर्षातील  सहा महिने समुद्र एका भागात खवळलेला असतो. त्याच वेळी दुसर्या भागातील समुद्र तितकाच शांत व सुंदर दिसतो. खवळलेल्या समुद्राचे रौद्र रूप मात्र भयावह असते. समुद्रकिनार्याला लागून डोंगर आहेत. वर्षभर पडणार्या पावसामुळे घनदाट अरण्याने हे डोंगर वेढलेले आहेत. त्यातूनच मधून मधून तुरळक वस्ती दिसते. एका डोंगरमाथ्याच्या एका घरापाशी जाण्याचा रस्ता त्याहूनही अवघड वाटला. समुद्रकिनार्यालगत असणार्या या निसर्गरम्य रस्त्यावरून  कुठूनही आपल्याला सागर दर्शन घडत असते. माहेच्या दक्षिणेस असलेल्या विमानतळावर उतरतानाच या बेटाचे मिहमय दर्शन आपल्याला घडते. तिथल्या  समुद्राच्या पाण्याचा रंग वेगळा व जात वेगळी आहे, याची जाणीव होते.

व्हिक्टोरिया या राजधानीच्या शहराची वस्ती २०,००० असून हेच सेशल्सचे मुख्य बंदर आहे. फारशी शेती व कारखाने नसल्यामुळे रोजच्या गरजेच्या वस्तूंपासून चैनीच्या वस्तूंपर्यंत सर्वच गोष्टी या बंदरातून आणल्या जातात. याच व्हिक्टोरिया शराच्या प्रमुख चर्चजवळ लंडनच्या क्लॉक टॉवरची प्रतिकृती उभी केली आहे. माहे बंदराखेरीज प्राले(३८ स्क्वेअर कि.मी), ला डिंगो(१० स्क्वेअर किमी)राऊंड आयलंड, तोयेनी, पक्ष्यांचे बेट, डेनिस अशा फक्त ८ ते १० बेटांवरच थोडीफार मनुष्य वस्ती आहे. इतर बेटे अजून निर्मनुष्यच आहेत. भारताच्या दक्षिण भागातून सेशल्स येथे गेलेले पिल्ले, शेट्टी ही कुटुंबे आता तिथे पाय रोवून उभी आहेत. पूर्वी हे लोक तेथील जंगलतोड करून लाकडाचा व्यापार करत. तसेच नारळ, कोको , दालचिनी, डेर (नारळासारखे फळ) यांची निर्यात करण्याचा व्यवसाय करीत. बरेचजण तिथेच स्थायिक झले. यामुळेच अजूनही सेशल्सचा बराच व्यापार भारतीय व चिनी लोकांच्या हातात आहे.

पर्यटन व्यवसायामुळे हॉटेल्स व त्याचबरोबर बांधकाम हे व्यवसाय सेशल्समध्ये महत्त्वाचे आहेत. याही व्यवसायात भारतीयांचा मोठा वाटा आहे. व्हिक्टोरिया शहरात श्री. विजय पटेल यांनी फक्त १३ महिन्यांच्या कालावधीत बांधलेले स्टेडियम म्हणजे एक प्रेक्षणीय  स्थळच आहे. आज साधारण पाच ते सहा हजार भारतीय तिथे स्थायिक झाले आहेत. सेशल्सचे संपूर्ण अर्थकारण हे पर्यटन व्यवसाय व टूना फिश निर्यातीवर अवलंबून आहे. या दोन व्यवसायातच ४०% कर्मचारे आगेत व ७०% परकीय चलनाची मिळकत यातूनच होते. टूना जातीचा मासा युरोपमध्ये निर्यात केला जातो. या दोन व्यवसायातून उपलब्ध होणारे परकीय चलन देशामध्ये लागणार्या वस्तूंच्या आयातीसाठी वापरले जाते. अर्थातच ते परकीय चलन पुरे पडत नाही. रोजच्या गरज्च्या वस्तू , चैनीच्या वस्तू, बांधकामासाठी लागणारे सामान इतकेच नाही तर बरेच प्रशिक्षित कामगार बाहेरून आणावे लागतात. त्यामुळे बँकांना परकीय चलन विनीयोग करताना वेटिंग लिस्ट करावी लागते. पर्यटन व्यवस्थेत सुधारणा करून पर्यटकांना अधिक आकर्षित करणे हाच सरकारचा एकमेव कार्यक्रम असतो. देशाला हवा असणारा आयात प्रामुख्याने युरोप, दक्षिण आफ्रिका, केनिया, सिंगापूर व चीन येथून केला जातो. युरोपिय सर्व देशांतून बहुसंख्य पर्यटक सतत येत असतात. त्यांना येथील समुद्रकिनारा, सूर्यप्रकाश, निसर्ग यांचे प्रचंड आकर्षण असते. फक्त शनिवार रविवारच्या सुट्टीसाठीसुद्धा युरोपातून प्रवासी येतात. या पर्यटकांसाठी बांधलेली एकाहून एक सुंदर हॉटेल्स समुद्रकिनार्यावर आहेत. त्यापैकी मलेशियन बरजय्या ग्रुपची तीन, प्लँटेशन क्लब व कोरल स्टँड ही हॉटेल्स फारच सुंदर आहेत. प्लँटेशन क्लबमध्ये जागतिक सुंदरी स्पर्धा व जागतिक फॅशन शो भरवले जातात.

व्हिक्टोरिया बंदरातून समोरच्या बंदरावर एक दिवसाची ट्रीप असते. बंदराच्या किनार्यावरून समोरच चार-पाच छोटी छोटी बेटे दिसतात. त्यापैकी एक लाँग आयलंड, एक राऊंड आयलंड असून एका बेटावर सेशल्सचा तुरुंग आहे. राउंड आयलंडवर  वस्ती माही, पण ते बेट इतके लहान आहे की , संपूर्ण बेटाला दहा  मिनीटात पायी फेरी पूर्ण होते. त्य बेटावर पर्यटकांसाठी एक  छोटे रेस्टॉरंट आहे. स्वादिष्ट जेवण व जेवणात टुना फिश आवर्जून  असतो. या छोट्या

बेटाच्या बोवतालचा समुद्र अत्यंत स्वच्छ, उथळ, निळाभोर आहे. त्यात खूप रंगीबेरंगी मासे व प्रवाळ शेवाळांचे निरनिराळे आकार, प्रकार व रंग पाहायला मिळतात. ते पाहणे म्हणजे एक स्वर्गीय आनंद असतो. काचेच्या खिडक्या व काचेचा तळ असलेल्या बोटीमधून आपल्याला दूरवर नेतात. काचेच्या खिडकीपर्यंतचा भाग पाण्यात असतो. आत बसून दोनही बाजूंच्या खिडक्यांमधून व तळाच्या काचेतून तुम्हाला रंगीबेरंगी मासे बघता येतात. तुमच्या आणि त्यांच्यामध्ये फक्त काचेचा पडदा असतो. एकच आश्चर्य वाटते ते हे की माशांचे कळप एकाच प्रकारचे डिझाईन असलेले एक ग्रुप करून बागडत असतात. ते एकमेकांना कसे ओळखू शकतात ते समजत नाही. समुद्रातील वन्स्पती , शेवाळ, प्रवाळ पाहून तर अचंबाच वाटतो. निसर्गाच्या या निर्मीतीपुढे नतमस्तक व्हायला होते. किती पाहू अन् किती नको असे होऊन जाते. बोटीतून फिरत असताना पर्यटकांना साहजिकच त्या माशांना स्पर्श करण्याची जबरदस्त इच्छा निर्माण होते. मग तुमची तीही इच्छा सफल केली जाते. थोडे अम्तर गेल्यानंतर पर्यटकांना पाण्यात उतरता  येते. तुमच्या तोंडावर मास्क आणि श्वासासाठी पाण्याच्या पृष्ठभागावर जाणारी नळी असे लावून तुम्ही पाण्यात उतरता. लगेचच तुमच्या अंगाभोवती असंख्य मासे गिरट्या घालू लागतात. तुम्ही त्यांना हात लावायचा कितीही प्रयत्न केला तरी ते तुमच्या हाताला लागत नाहीत. मात्र मध्येच एखादा मासा तुअम्च्या गालाला किंवा शरीराला स्पर्श करून जातो. खाली उथळ असलेल्या तळाशी नजर जाताच तर्हेतर्हेचे प्रवाळ, शेवाळ दिसतात. हे पाण्याच्या तळाशी पोहणे वाटते तितके सोपे मुळीच नसते.  याला स्नॉर्कलिंग म्हणतात. तास  दीड तास तुमचा व्ळ कसा जातो ते समजतही नाही. आयुष्यात एकदा तरी हा अनुभव घ्यायलाच हवा असा आहे. सेशल्सच्या एकूण बेटांपैकी माहे  हे बेट सर्वात मोठे असूनही त्या बेटाच्या किनार्याने फेरी मारण्यास एक दीड तास पुरेसा होतो. त्या बेटावर असणारे अनेक बीचेस विविधस्वरूपात दिसतात. विशेषतः माहे बीच, उत्तरेकडचा बाओलीन बीच, ईशान्येकडचा बीच फारच सुंदर आहेत. बाओलीन बीचच्या समुद्रात तासन् तास डुंबत राहिलो तरी समाधान होत नाही. या बीचवर तुम्हाला हेलिकॉप्टरने समुद्रात थोड्या अंतरावर उंच घेऊन जातात आणि उंचावरून पॅराशूटच्या सहाय्याने तुम्हाला समुद्रात सोडून देतात. काही काळ तुम्ही समुद्रात कशाच्याही आधाराविना असता. पॅराशूटमुळे तुम्ही नक्की बुडत नाही. थोड्या वेळाने दुसरी बोट येऊन तुम्हाला पाण्यातून बाहेत काढते आणि किनार्यावर  घेऊन येते. हा मोठा थरारक अनुभव असतो. हे व असे अनेक पाण्यावरचे खेळ तुम्हाला खेळता येतात. ही सागरावरची  मौज पर्यटक मनमुराद लुटतात. सेशल्सच्या चौफेर असणार्या  समुद्रकिनार्यावर काळे, लाल दगट व खडक आहेत. या खडकावर तासन् तास बसून जोरात येणार्या पाण्याच्या लाटा पायावर आपटून घेणे म्हणजे एक विलक्षण अनुभव असतो. परंतु काही ठिकाणी काही वेळा या लाटा इतक्या मोठ्याने व जोराने येत असतात की , आपण त्यांच्या जवळसुद्धा जाऊ शकत नाही. सागराचे हे रूप पाहून मनाचा थरकाप  होऊन जातो, परंतु कितीही म्हटले तरी समुद्र अनुभवायला, मनसोक्त डुंबायला आणि समुद्रासारखेच मन अथांग भरून यायला  सेशल्सला  भेट  द्यायलाच हवी. सेशल्सहून मॉरिशसला जाण्यास २ तास १० मिनीटांचा विमान प्रवास लागतो. मॉरिशस हा देशही सेशल्स इतकाच सुंदर व प्रेक्षणीय आहे. मॉरीशसला ज्वालामुखीने मिर्माण झालेली जमीन व मधेच असलेली डोंगरांची  रांग आहे. मॉरिशस हा देशही सेशल्स इतकाच

सुंदर व प्रेक्षणीय आहे. मॉरिशसला ज्वालामुखीने निर्माण झालेली जमीन व मधेच असलेली डोंगरांची रांग आहे. मॉरिशस सेशल्सपेक्षा अधिक प्रगत आहे. प्रथमतः डच व नंतर इ.स. १७१५ मध्ये फ्रेंच आले. त्यांनी इथे रस्ते, बंदर व साखर कारखाने सुरु केले. आफ्रिका व मदागास्कर येथून ऊस लागवडीसाठी गुलाम आणले. इ.स. १८१४ मध्ये ब्रिटीशांनी या प्रदेशांवर ताबा मिळवला. इ.स. १८३५ पासून भारतीयांनी येथे येऊन साखर उद्योग भरभराटीस आणला. १२ मार्च १९६८ रोजी मॉरिशस हे स्वतंत्र राष्ट्र उदयास आले. भारतीय लोकांची वाढती लोकसंख्या व त्यांना मिळालेला मतदानाचा अधिकार यामुळे राजसत्ता मूळच्या क्रिओल लोकांकडून भारतीय वंशाच्या लोकांच्या हातात आली. मॉरिशसमध्ये हिंदू मॉरिशियन ६८%, क्रिओल २७% व इतर ५% लोक आहेत. हिंदू , ख्रिश्चन व मुस्लिम धर्म तिथे आहेत. साखर उद्योगाबरोबरच तिथे वस्त्रोद्योग, पर्यटन व प्रेशस स्टोन्स, पर्ल्स हे व्यवसाय आहेत. मॉरिशसची पोर्ट लुईस ही राजधानी म्हणजे आपल्या फोर्ट मुंबईप्रमाणे आहे. मॉरिशस ही फ्रेंच वसाहत होती. त्यामुळे पोर्ट लुईसचे बांधकाम , रस्ते, रचना पाहून पॅरीसचीच आठवण येते. अत्यंत स्वच्छ मोठे रस्ते, शिस्तबद्ध वाहतूक हे पाहून कोणत्याही आधुनिक प्रगत जगात गेल्यासाखे वाटते. इथे चहू बाजूंनी समुदकिनारा असून पाण्यातील खेळ, सुंदर भव्य हॉटेल्स आहेत. दीड दोन दिवसात संपूर्ण मॉरिशस हिंडून होते. मॉरिशसमधील भारतीय लोक मूळचे बिहारमधून तिथे गेलेले आहेत. अजूनही बर्याच घरात भोजपुरी भाषा बोलली जाते. आपण भारतीय असल्याचा त्या लोकांना फार अभिमान आहे. भारतातून कोणी तिकडे गेलेले त्यांना भेटले की, देवदूत आल्यासारखा त्यांना आनंद होतो. गंगासागर या तलावाचे काठी राम, कृष्ण, व शिवमंदिर अप्रतिम बांधले आहे. ज्वालामुखीमुळे निर्माण झालेला खोल खड्डा (crater)आहे. त्याची खोली १५ असून तळाशी पाणी आहे. मॉरिशसच्या एका भागात काही एकरांचा एक जमिनीचा तुकडा आहे. या भागावर ज्वालामुखीचा परिणाम होऊन तिथली जमीन सात रंगांची बनली आहे. सातही वेगवेगळे रंग तुम्ही सहज पाहू शकता. नैसर्गिकपणे भूमातेला दिलेले हे रंगीत वस्त्र पाहताना अवाक होऊन आपण पाहतच राहतो. सूर्याच्या किरणांनी त्या भागातील भूमातेला स्पर्श केला की भूमाता लाजून चूर होते आणि तिच्या शरीरावर एक वेगळीच चकाकी उजळून येते. निसर्गाचा हा एक आगळा वेगळा चमत्कारच आहे. सेशल्स व मॉरिशस ही पर्यटन स्थळे असल्यामुळे तिथे कॅसिनोज नसते तरच नवल वाटले असते. लास वेगासची जुगारी दुनिया येथे येण्यापूर्वी मी पाहिली असल्यामुळे मला इथले कॅसिनोज कमी वाटले. तरी तसेच वातावरण , तशीच धुंदी, तसाच झगमगाट व तसाच नाण्यांचा खणखणाट ऐकायला मिळाला हा मोह तुम्ही आवरूच शकणार नाही. दोनही ठिकाणच्या हॉटेलमध्ये संगीत , नृत्य यामुळे सायंकाळपासून मध्यरात्रीपर्यंत धुंद करून टाकणारे वातावरण असते. सेगा नृत्य व त्यासाठी पेहराव केलेले रंगीबेरंगी घोळदार झगे घालून फुलवून केलेले हे नृत्य पाहत रहावे असे असते. या दोनही देशातील निसर्गाचे खजिने व सामुद्रिक संपत्ती पाहून मन तृप्त होते. पृथ्वीवर याच्याइतके मानवाचे निसर्गाची ऐक्य , एकात्म , तादात्म्य कोठेही नसेल असे वाटते. प्रत्येक क्षणाला हा सुंदर निसर्ग पाहताना आपल्या स्वप्नातील एकेक पानच उलगडत गेल्यासारखे वाटते. या एका बाजूस असलेल्या समुद्रातील या बेटांच्या समुहावर जे प्रथमतः गेले असतील त्यांना किनार्यावरील मऊ मऊ पांढरी वाळू, उंच उंच नारळाची झाडे, किर्द दालचिनीचे दाट

अरण्य, माशांचे मर्ग व सागराच्या तळाशी असलेले प्रवाळ , शेवाळ वनस्पती पाहून काय आनंद झाला असेल, याह्ची कल्पना केलेलीच बरी. मी तर त्यानंतरच्या आयुष्यात या दोन आठवड्यांच्या आठवणी मनात घोळवत सुंदर स्वप्नांना कुरवाळत कोणत्याही अडचणींच्या काळात दुखर्या मनावर  फुंकर घालायचा प्रयत्न करतो. आकाशातील , समुद्रामधील व निसर्गाचे वेगवेगळे रंग आठवून कोणताही क्षण मी रंगतदार करू शकतो.

अरविंद साने



# मँगो फ्रोयो



**जिन्नसः**

३/४ कप मँगो पल्प किंवा ताजा आंब्याचा रस

१ कप ग्रीक योगर्ट

१ टीस्पून मध (आवडत असल्यास)

**कृती:**

१. वरील सर्व साहित्य मिक्सर किंवा ब्लेंडरमधून फिरवून घ्यावे.

२. हे मिश्रण आता एका तुम्हाला हव्या तश्या भांड्यात काढून घ्या. ताज्या आंब्याच्या फोडी चिरून किंवा रासबेरीज वापरून सजावट करावी.

३. ६-७ तास फ्रीजरमध्ये ठेवावे आणि थंड सर्व्ह करावे.

केतकी जोशी

# आम्रखंड





**जिन्नस :**

१. ६४ oz प्लेन/ ग्रीक योगर्टचा डबा

२. २-२.५ कप साखर

३. २ कप  मँगो पल्प

४. १ टेबलस्पून वेलची पूड

५. १-१.५ टीस्पून केशराच्या कांड्या

६. चक्का बांधण्यासाठी चीज क्लॉथ/ उशीचा अभ्रा (कव्हर)

**पाककृती:**

दही किंवा ग्रीक योगर्ट जे घेतले असेल  ते चीज क्लॉथ किंवा उशीच्या अभ्र्यामध्ये  काढून घ्या.  चीज क्लॉथ /अभ्रा अगदी घट्ट बांधून थोड्याशा उंचीवर टांगून ठेवा. त्या टांगलेल्या गाठोड्याखाली एखादे भांडे ठेवा जेणेकरून दह्यातले गळणारे पाणी त्या भांड्यामध्ये साठेल. साधारणतः २४ तास अश्याप्रकारे दही टांगून ठेवा. २४ तासांनंतर त्यातील पाणी पूर्णपणे निघून गेले असेल आणि घट्ट  चक्का तयार होईल. आता हा चक्का एका मोठ्या भांड्यात काढून घेऊन त्यामध्ये

साखर, मँगो पल्प, केशराच्या कांड्या, वेलची पूड हे सगळं एकत्र करून छान घोटून घ्या. मिश्रण अगदी छान घोटलं गेलं पाहिजे , त्यात एकही गुठळी राहता कामा नये.

घोटून झाल्यावर तुमचं हे स्वादिष्ट आम्रखंड तयार आहे! गरमागरम पुर्यांबरोबर त्याचा आस्वाद घ्या!

**वाढणी प्रमाणः**

वरील दिलेल्या प्रमाणात साधारण ४ ते ६ व्यक्तींसाठी आम्रखंड होईल.

**वेळ:**

या सगळ्या कृतीत सगळ्यात जास्त वेळ लागतो तो चक्का तयार होण्यासाठी. साधारण २४ तासांनी चक्का तयार झाल्यानंतर तीसेक मिनिटांमध्ये आम्रखंड तयार होते.

**खास टीपाः**

दही शक्यतो रात्रीच टांगून ठेवा म्हणजे साधारणतः दुसर्‍या दिवशी रात्री तुमचा चक्का तयार झालेला असेल. आम्रखंड तयार झाल्यावर सजावटीसाठी त्यावर थोडा आंब्याचा रस शिंपडून रासबेरीज लावू शकता.

या आंब्याच्या सीझनमध्ये ही पाककृती नक्की करून बघा आणि तुमच्या कुटुंबाबरोबर या स्वादिष्ट आम्रखंडाचा आस्वाद घ्या!!

रेणू रानडे



# पियुष



**जिन्नसः**

१. १ कप दही

२. १ कप घट्ट ताक

३. १ कप श्रीखंड किंवा (३/४ कप चक्का आणि १/२ शुगर)

४. १ कप मिल्क

५. साखर - जितके गोड हवे त्याप्रमाणे

६. ३-४ वेलचींची पूड करून घेतलेली

७. ४-५ केशराच्या कांड्या

८. १/८ टीस्पून जायफळ पावडर

९. बदाम / पिस्त्याचे काप आणि केशर सजावटीसाठी

**पाककृती:**

सजावटीचे साहित्य वगळता इतर सर्व साहित्य एकत्र करून घ्या. मिश्रण हळूवारपणे घुसळून घ्या. सर्व्हिंग ग्लासेस मध्ये मिश्रण ओतल्यावर त्यावर केशर व बदाम / पिस्त्याचे काप वापरून सजावट करा.

**वाढणी/प्रमाण:**

वरील प्रमाणात साधारणतः ४ लोकांसाठी पियुष तयार होते. साधारण लस्सी एवढा दाटपणा यायला पाहिजे.

**खास टीपा:**

हे मिश्रण ब्लेंडर मध्ये घुसळू नका. त्याने मिश्रण जास्त पातळ होते. पारंपरिकरित्या पियुष जास्त गोड असते. त्याचप्रमाणे त्यात जायफळ पूड घालणे आवश्यक आहे कारण जायफळाने सुरेख स्वाद येतो. पण जायफळाच्या प्रमाणावर मात्र लक्ष ठेवा कारण थोडे जरी जास्त झाले तरी पियुष कडवट होऊ शकते. केशराचे सिरप घातल्याने सुरेख पिवळा रंग येतो पियुषला. बऱ्याचश्या लहान उपहारगृहांमध्ये पियुष अश्या पद्धतीने दिले जाते.

पल्लवी सावंत





शब्द आणि सुरांची अनोखी मैफल .....
अमेरिकेत
संगीतकार, गायक आणि 'शहाण्या माणसांची फॅक्टरी' व 'लपवलेल्या काचा'
चे लेखक सलील कुलकर्णी ह्यांची बहुरंगी मैफल .....
माझे जगणे होते गाणे
अभंग ते बालगीतं आणि अभिजात कवितांची गाणी ..... तुमच्या फर्माईशी
सोबत: आदित्य आठल्ये, रितेश ओहोळ
Marathi Mandal Sacramento
SACRAMENTO
Presents: Saleel Kulkarni
Aditya Athalye & Ritesh Ohol
With Local Talent
Date: Friday June 2nd
@7:00PM
Time: Gate Opens at 6:45PM
Venue: Stage 2, Harris Center
(10 College Pkwy, Folsom, CA 95630)
Box Dinner From 6:00 PM – 6:45PM
For more information Visit http://mmsac.org

# KIFS Kotwal Insurance & Financial Services

***People don't plan to fail, They just fail to plan***

When it comes to happy retirement, key is to plan well.

**Dear Friend,**

**Just Half an Hour with Me Can HELP you:**

- Plan for your children's college education
- Generate a **tax free** income from retirement till age 100
- Roll over your orphan IRAs and 401 Ks into meaningful, secure investment for guaranteed retirement income.
- Select a right insurance policy to cover your **mortgage** fully in case of death
- Reevaluate your existing insurance policy free of cost and if necessary suggest a better policy that will give you life coverage and completely tax free retirement income

In short, help you with planning all aspects of your financial life. Please call

**Ray Kotwal, MBA Finance**

**Life Insurance and Planning Specialist**

**Insurance License No. OH12645**

Remember KIFS for all your financial needs

Kotwal Insurance & Financial Solutions

www.raykotwal.biz raykotwal@hotmail.com

# संतांची महती



## श्री संत तुकाराम महाराज

नुकतीच १४ मार्चला तुकाराम बीज होऊन गेली. फाल्गुन  वद्य द्वितीया इ. स. १६५० ह्या दिवशी श्री तुकाराम महाराज सदेह वैकुंठाला गेले. हिंदुस्थानातल्या नव्हे तर जगाच्या इतिहासात असे कधी घडले नाही.  प्रत्यक्ष श्री विष्णु आपल्या गरुड वाहनावर बसुन इहलोकी आले आणि बुवांना आपल्याबरोबर घेऊन गेले. तुकाराम बीजेच्या दिवशी देहूला ४-५ लाख लोकांचा समुदाय जमतो आणि सारा परिसर हरिनामाच्या कीर्तनात रमतो.

तुकाराम बुवांचा जन्म इ. स. १६०८ चा. त्यांच्या आईचे नाव कनकाई व बाबांचे नाव बोल्होबा असे होते. बुवांचे संपूर्ण नाव

तुकाराम बोल्होबा अंबिले असे होते.  जुन्या मुंबई पुणे रस्त्यावर, पुण्यापासून साधारण ११-१२ मैलांवर नाशिक कडे जाणारा रस्ता लागतो. तिथे उजवीकडे वळल्यावर सुमारे ६ मैलांवर, आळंदी ते देहू असा आडवा रस्ता मिळतो, तिथे डावीकडे वळून १० मैल गेले की देहू गावाचा सुंदर परिसर लागतो हेच ते देहू गांव!

श्री बाबाजी चैतन्य हे तुकाराम बुवांचे गुरु! बुवांना स्वप्नांत "रामकृष्णहरी" असा गुरुमंत्र मिळाला. संसारातील अपरंपार कष्ट; त्यामुळे वैराग्य आधीच होते त्यात गुरूंचा प्रसाद मिळाला. एकांती बसून सतत नामस्मरणामुळे परमेश्वर प्राप्तीची  वाट सापडली. त्यांच्या मुखातून प्रासादिक वाणी - उत्तरे बाहेर पडू लागली. अवघ्या ४२-४३ वर्षांच्या आयुष्यात एकनिष्ठ भक्तिमार्गाने परमेश्वर प्राप्ती करून घेतली. ते पंढरपूरच्या विठोबाचे निस्सीम भक्त झाले. आषाढी - कार्तिकीच्या वाऱ्या सुरु झाल्या. पांडुरंगा  शिवाय त्यांना चैन पडेना. मंगळवेढयाचे  संत शिरोमणी श्री नामदेव महाराज बुवांच्या आधी सुमारे ४०० वर्षे होऊन गेले. ते प्रत्यक्ष पांडुरंगाचे बोट धरून बुवांच्या स्वप्नांत आले व त्यांनी सांगितले की माझे अभंग करण्याचे काम अर्धवट पूर्ण झाले आहे ते तू पूर्ण कर. तू वारकरी आहेसच तर आता वैदिक धर्माची पताका उंच कर.

श्री तुकाराम महाराजांनी ४००० च्या वर अभंग लिहिले. साधारणतः: ३ -४ कडव्यांचे, प्रत्येकी  २-२ ओळींचे साडे  तीन चरणांचे असे ते आहेत. एकाच छंदात लिहिल्यामुळे गायला अतिशय सोपे आहेत. अतिशय सोप्या भाषेत त्यांनी सर्वांना आपल्या अभंगातून भक्ती मार्गाचा अर्थ सांगितला. नंतरच्या काळात हे सारे अभंग  एकत्रित केले गेले. तीच आज "अभंग गाथा" ह्या नावाने प्रत्येक मराठी माणसांच्या संग्रहात आहे.

श्री तुकाराम महाराज हे श्री शिवाजी राजांच्या समकालीन होत. शिवाजी महाराजानी इ.स. १६७४ मध्ये स्वतःस राज्याभिषेक करविला. मराठी राज्य व्हावे ही श्रींची इच्छा  आहे ती मी पूर्ण करणार अशी  त्यांनी वयाच्या १४  वर्षी, रोहिडेश्वराच्या मंदिरात जाऊन शपथ घेतली व ती पूर्ण केली. असो.  पण त्या आधी राजे, तुकाराम बुवांकडे मोंगलांचा पाठलाग चुकवीत  कर्मधर्म संयोगाने देहूत आले व बुवाच्या कीर्तनाला बसले आणि इतके रंगून गेले की  ते परत जावयास तयार होईनात व मी आता हरिभजनात सगळे आयुष्य घालवणार असे म्हणू लागले. तेव्हा बुवांनी मोठ्या मुश्किलीने समजावले. ते म्हणाले " राजे तुमचा जन्म वेगळ्या कारणासाठी झाला आहे. कर्म मार्गातून भगवदप्राप्ती हा तुमचा मार्ग! तो तुम्ही मराठी राज्याची स्थापना करून, मराठी माणसांची परप्रातीयांच्या बंधनातून सोडवणूकीने; पूर्ण करा, असा सदुपदेश केला. कोणतीही अडचण आली की त्या पांडुरंगाची आठवण करा. तुमच्यावर आई जगदंबेची संपूर्ण कृपादृष्टी आहेच ती तुमची सर्व संकटातून काळजी घेईल असे सांगून राजांची बुवांनी पाठवणी केली.

पण जगात जसे चांगले लोक आहेत तसेच एखाद्याचा उत्कर्ष सहन न होणारे पण लोक असतातच. एका वैश्य समाजातील माणसाला इतका मान, इतका लौकिक! सगळे लोक तुका म्हणे, तुका म्हणे करताहेत, बुवांचे अभंग म्हणताहेत. एवढेच नव्हे तर हा तुक्या वैदिक धर्माचा प्रसार करण्याचा आव आणतो आहे, हे देहूतील रामेश्वर भट्ट आणि त्यांच्या सारखे जे लोक देहूत होते त्यांना सहन होईना. तुला हा वैदिक धर्माचा चुकीचा अर्थ सांगून लोकांची दिशाभूल करण्याचा काहीएक हक्क नाही, तेव्हा तू आताच्या आता तुझ्या साऱ्या वह्या इंद्रायणीत नेऊन बुडवून टाक. तुकाराम महाराजांना मोठे वाईट वाटले त्यांनी ह्या लोकांना समजावयाचा प्रयत्न केला. हे अभंग मी रचले नाहीत. ते मी माझ्या बुद्धीने केले नसून परमेश्वराच्या आज्ञेने माझ्याकडून वदवून घेतलेले आहेत. तरी तुमचा माझ्यावर एवढा रोष का? ही मंडळी जसे ऐकेनात तसे त्यांनी त्या सर्व वह्या इंद्रायणीत नेऊन बुडवल्या. आता माझ्या आयुष्याला काय अर्थ उरला आहे म्हणून बुवांनी तेथेच इंद्रायणी काठी ठाण मांडून उपोषणास सुरवात केली. असे १३ दिवस गेले बुवांनी पाण्याचा थेंब सुद्धा घेतला नाही. १३ व्या दिवशी इंद्रायणी नदी देवीरूपात येऊन, तिने तुकाराम महाराजांना दर्शन दिले व बुवांच्या सगळ्या वह्या जशाच्या तश्या, कोरड्या ठणठणीत त्यांच्या हाती दिल्या इकडे रामेश्वर भट्टाच्या सर्वांगाला कंड सुटल्यामुळे त्यांच्या अंगाची लाही लाही होत होती ते इंद्रायणीत अंघोळ करून देहास गार करावे म्हणून आले तो त्यांना हा चमत्कार दिसला. तुकाराम बुवांनी त्याच्या देहावरून हात फिरवल्याबरोबर रामेश्वर भट्टांच्या सर्वांगाची आग थांबली. त्यांनाही बुवांचे ईश्वरत्व प्रत्ययास आले. ते पुढे बुवांचे पट्टशिष्य झाले.

आपल्याला ज्या कारणासाठी देवाने इहलोकी पाठवले ते कार्य पूर्ण झाले, आता आपले इथे काय काम? असे उमजून फाल्गुन वद्य द्वितीयेला इ.स. १६५० साली त्यांनी हरी नामाच्या गजरात सदेह वैकुंठास प्रयाण केले. तोच हा तुकाराम बीज दिवस.

हरी भक्तीशिवाय परमेश्वराची प्राप्ती नाही ही त्यांची शिकवण आहे.

आलिया संसारा उठा वेग करा, शरण जा उदारा पांडुरंगा

देह हे काळाचे धन कुबेराचे, तेथे मनुष्याचे काय आहे ---१

देता देवविता नेता नवविता, येथे याची सत्ता काय आहे

निमित्याचा धनी केला असे प्राणी, तुका म्हणे माझे माझे म्हणुनी व्यर्थ गेला ---२

मुलांमुलींनो! तुम्ही कधी पुण्याला गेलात तर नक्की देहूला जा, मोठा सुंदर परिसर आहे शेजारी इंद्रायणी नदी वाहते आहे. तुम्हाला फार फार आनंद होईल.

कुमार कुलकर्णी



Reliance
SuperMart
Indian & International Groceries


California IVF
Fertility Center
530-771-0177
www.CaliforniaIVF.com
Laurie Lovely, MD
Ernest Zeringue, MD
Pravin Goud, MD, PhD
Offices in Roseville and Davis

# मैदानी खेळ

मुलामुलींनो! सध्याच्या दिवसांत तुम्ही जेंव्हा हळुहळू मोठे होत आहात तसे डेस्कटॉप, लॅपटॉप, टॅँबलेट, सेलफोन इत्यादी उपकरणांची आवश्यकता आहेच. पण त्याबरोबर स्वतःच्या स्वास्थ्याची, आरोग्याची, प्रकृतीची काळजी घेणे अतिशय महत्वाचे आहे. कितीवेळ टॅबलेट वा सेलफोन बरोबर वेळ घालवायचा हे आपण आपल्या विचाराने ठरवायचे आहे. हिंदुस्थानात आम्ही सर्व, तुमचे आईवडील, आजीआजोबा जेंव्हा मोठे होत होतो तेव्हा संध्याकाळी जवळपासच्या मोकळ्या मैदानावर जाऊन, लंगडी, हुतूतू, आट्यापाट्या, खो खो, लगोरी असले खेळ खेळायचो. काही जण क्रिकेट, सॉकर अथवा टेनिस खेळायचे. तेव्हा सुद्धा घरातच वेळ घालवायला टीव्ही सारखी साधने होती तरी पण आम्ही बाहेर खेळायला जायचो.

इथेसुद्धा आपल्या गावांत, जवळ जवळ मैला दोन मैलांच्या अंतरावर लहान मोठे पार्क्स आहेत. तिथे आपल्याला बास्केटबॉल, सॊकर, टेनिस, बेसबॉल, घसरगुंड्या, झोपाळे असे खेळ खेळता येतील.

नुकतीच ह्या महिन्यांत, आपली घड्याळे १ तास पुढे गेली आहेत त्यामुळे आता दिवस हळूहळू मोठा होऊन खूप वेळ भरपूर उजेड असणार आहे. मैदानांत जाऊन वरील प्रकारचे खेळ खेळल्याने आपला उत्साह, शक्ती द्विगुणित होते, मनाला ताजेपणा येतो. संध्याकाळी डिनरच्या वेळी भरपूर भूक लागते, रात्री शांत झोप लागते. झोप पूर्ण झाल्यामुळे आपल्या आईबाबानी उठावायच्या आतच - उठा आता, शाळेची वेळ होत आली आहे उठा लवकर - असे म्हणावे लागणार नाही. संध्याकाळी अशा तर्हेचे खेळ खेळावयास आपल्या बरोबर आपल्या आईबाबांही आनंदाने तयार होतील. तेही तुमच्या बरोबर खेळू शकतील अथवा तुमच्या मित्रमैत्रिणींबरोबर आलेल्या त्यांच्या आईबाबांबरोबर गप्पा गोष्टी करत मोकळ्या हवेचा आनंद लुटू शकतील. मग काय जाणार ना आता खेळायला पार्कमध्ये?

कुमार कुलकर्णी




WELCOME TO OUR NEW LOCATION!
www.FolsomFamilyDental.com • 1568 Creekside Dr. Suite 202, Folsom, CA 95630
PAWAR DENTAL
CORPORATION
YOUR ONE STOP SMILE SHOP!
Call Today for an Appointment!
(916) 235-6212
Benefits We Offer
✓ Dental Cleanings
✓ Low Radiation Digital X-Rays
✓ Sedation Dentistry
✓ Dental Crowns
✓ Teeth Whitening
✓ Oral Surgery
✓ Dental Fillings
✓ Orthodontics
✓ Implants and Bridges
✓ Dental Emergencies
✓ Most Insurance Accepted
✓ Caring and Helpful Office Staff

# Maharaja Shivaji – The greatest Marathi king



## Early childhood – Learning to be great! Article 1 of 4

**Author: Ajit Natu**

---------------------------------------------------------------------------------------------

I would like to tell our next generation kids from age 4-18 and youth, how great was Shivaji Maharaj. This will be a series of 4 articles to be published in next 4 editions. Parents can read it with their kids and expand more on Shivaji's life. Let us make our children aware of not just the name of Shivaji but also the details of his life and character.

Kids, Maharaja mean Raja of all Raja i.e. literally king of kings. Indeed, if you study history of many kings all over the world, there would be very few parallels to the life and achievement of our own, Marathi king, Shivaji. Such was his greatness that even in 1960-70s decade, Vietnam President, to everyone's surprise, mentioned openly that his country adopted Raja Shivaji strategy of how to fight a war against a mighty enemy and still come on a winning side. Wow!

I think any person with Indian heritage and especially Marathi background and upbringing should know Shivaji's achievements. As you must have heard that the greatness in elder life is always sowed during the upbringing years. It is a fact. It is the early age where glimpses of greatness are observed but the greatness needs to be nurtured and properly given guidance and direction in childhood by parents and teachers. This is what we will go through in the following section in this edition – the childhood and upbringing of Raja Shivaji that made him great.

Shivaji was born in the year 1630 in month of April. His father was Shahaji Bhosle who was in military service of then kingdom of Mogul kings. His father was generally away due to service duties during Shivaji's childhood. But like any other father, he imbibed in Shivaji a will to fight, encouraged to acquire skills to fight and above all opened his mind to his own dreams of being a king one day. Kids, dreaming of higher goals is important in early life because you need to set yourself goals that may be impossible at that early age but dreams give you something to march towards, set your mind to work hard for it. Shivaji was mainly nurtured and influenced by his mother Jijabai. In fact, in history, you will find great people have simple mothers but those mothers created great leaders through their own way of imparting and teaching qualities to be great. Mother Jijabai did exactly that. It is said that she used to tell Bal (child) Shivaji stories from Indian history of great warriors, character of great kings, how King Ram fought Rakshas Ravana, how Lord Krishna used more of strategy and tactics than just strength to fight more mighty Kauravas and so on. She told this through stories and not lectures which child Shivaji was listening, absorning and his character was developed by his mother and these stories.

The teachings of mother and great history had such a strong influence on Shivaji that he soon started showing signs of greatness. Instead of playing usual kids games, child Shivaji gathered young friends to mock up how to fight a war between two friends sides during their evening games, how to climb difficult fortress, studied the regions small details such as where small number of soldiers can outdo large enemy due to a positional upper hand, how to inspire your team and so on. Along with his mother, his teacher, Guru Dadaji Konddev, taught him all the skills required to be a figher and a warrior such as using sword, dhaal (protective armament), how to ride horse through any tough terrain, how to use Thophaa (then used massive armament to throw missile like war power on enemy), what is the importance of fort (known Gad

or Killa used to how you establish superiority) and so on. It is said that Shivaji showed such dedication in quickly learning these skills that by age 13-14 that he became expert very early in childhood in being a warrior and could lead his team of friends on various outdoor ventures and mock up fights. During evening times, at home, he listened to his mother telling him Shrimad Bhagvad Geeta teachings, other stories that developed his mind how to be a good human being, how to be proud of your own culture, how to find ways through difficult situation, how to lead. Kids, note down these last few characters in your mind. These appear easy to read but these are the qualities that you need to acquire as kids to become great in elder life. Shivaji used these teaching in his future while tackling so many impossible situations, coming out on a winning side from a hopeless corner and importantly when to retreat only to spring back on top. For example, how Shivaji tackled Afzalkhan situation, Siddi situation, Delhi confinement show his learning was actually used. We will go through these situations in future editions that I will write but for now, understand that the childhood upbringing made those incidences possible to tackle in Shivaji's life. This is why, kids, you insist upon your parents to explain this article about Shivaji and childhood of him to understand in details or contact me so I can tell you further stories of his childhood. Shivaji also was taught by his Guru Kondeve and by his mother about war strategies how to love people, how to inspire people, how kings in past had been arrogant to see their downfall, how to respect culture, religion, elders, women, how to judge enemy strength, how to read any situation and come up with possible options for a better solution, how to make real friends who would give their life for your word for a just and sowing dreams of being a great king.

The first phase of Shivaji life was from his birth until his age 16 when to everyone's surprise he conquered the fort Tornaa in a bloodless war with tactics and paving his march towards the greatness. Fort Tornaa was the start of future winning of many wars. But for now, let us end this article with another culmination of Shivaji's early phase of childhood as he was about to enter youth and maturity.

That specific incidence is well known as 'Taking an oath for freedom'. As we read above, Shivaji was nurtured into a good character. By age 15-16 he was ready to take next leap into actually performing what has been taught and be on the way of giving freedom to then imprisoned Marathi speaking geography and spread the freedom getting rid of Mogul kingdom. One day when Shivaji was 16, on his own, gathered his troupe of friends, who have been with him all along going through above teachings and games, in a temple of Shiva (Lord Shanker). On top of the Shankar Pindi (ask your parent what this Pindi is or you will see in a temple), he took his sword and gave a little cut to his finger, without showing any pain, with stern face, mind and Asmita (Pride), he took a oath that he would dedicate his life for freedom of people from Mogul kings who were harassing people. He asked who were with him in his march and all of his friends inspired by his did, took similar oath. A profound incidence if you think about at that

early age. It just took over Shivaji and his friend's life in one and only one goal. From that day, individual life of Shivaji was converted into a cause for social, cultural freedom and dedication to Marathi Kingdom. It occupied him with one and only one goal of making people free.

Kids, read the above not just as an article but for getting the essence of it and what I want to convey which is "learn good qualities early in childhood". If you start inquiring to your parents about Shivaji and how you can be good in life, then, I would say, this article served its purpose. Do not hesitate to be proud of your culture, your background and try to learn, grasp as much good there is through games, stories and from parents. Next time, we will read Shivaji's next phase of his march towards greatness, how he fought wars, how he captured large territory under his wings, freed large section of people from Mogul binds and became a great warrior and leader.

--- By Ajit Natu, Folsom, USA, May 2017.

# मराठी शाळा अहवाल

सॅक्रामेंटो मराठी शाळेचे तिसरे वार्षिक स्नेहसंमेलन या वर्षी १२ मार्चला उत्साहात साजरे झाले. सर्व विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्या सहकार्याबद्दल मनापासून आभार. सर्व विद्यार्थ्यांनी भरपूर तयारी करून अस्स्खलित मराठीत कार्यक्रम सादर केला.  बरेच वेळा असे वाटत होते की  आपण पुण्यात तर नाही ना!

फॉल्सम शाखेच्या छोट्या वर्गाने फळांची माहिती सांगितली.  मुले आपापल्या फळांसारखे कपडे घालून फारच गोड दिसत होती. पहिलीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी भारतातील थोर व्यक्तींची माहिती त्यांच्या वेषात आणि आवेशात सादर केली. विद्यार्थी आणि पालक यांनी केलेली जबरदस्त तयारी सादरीकरणात दिसत होती.

दुसरीच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या आजी-आजोबांबद्दल आणि त्यांच्या मूळ गावाबद्दल माहिती सांगितली. त्या वेळेला मुलांच्या चेहेऱ्यावरचे  कौतुकाचे भाव बघण्यासारखे होते.  तिसरीच्या विद्यार्थ्यांनी स्वतः २ छोट्या नाटुकल्या लिहून सादर केल्या. या मुलांचे कौतुक करावे तेव्हढे कमी आहे. गेली ३ वर्षे हे विद्यार्थी स्वतःचे नाटक सादर करतात. नाटकाची संकल्पना पण त्यांची आणि दिग्दर्शन पण! दरवर्षी मुले जशी वरच्या वर्गात जातात तशी त्यांची  मराठी भाषेवरची पकड आणि सादरीकरणातला सहजपणा पण वाढलेला दिसतो.

रोझवील शाखेच्या विद्यार्थ्यांनी बालगीते सादर केली. बालगीतामधील भाव त्यांना सहज प्रकट करता आला. या मुलांनी अतिशय थोड्या वेळात छान तयारी केली होती.

बालविहार शाखेच्या विद्यार्थ्यांनी मराठी भाषा दिन आणि भाषेची परंपरा या विषयावर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी स्वतः संशोधन करून, अभ्यास करून त्यांचे विचार सादर केले होते याबद्दल त्यांना शाबासकी द्यायला हवी.

उपस्थित पालकांनी आणि प्रेक्षकांनी विद्यार्थ्यांना भरघोस प्रतिसाद दिला आणि त्यांचे भरपूर कौतुक  केले.  मराठी शाळेच्या शिक्षकांनी घेतलेले कष्ट विद्यार्थ्यांनी सार्थकी लावले असे हा कार्यक्रम बघून वाटत होते. सर्व पालकांनी पण शिक्षकांना मुलांच्या प्रगतीचे श्रेय दिले.  खरोखर या सर्व विद्यार्थ्यांना मोठी शाबासकी द्यायला हवी. अमेरिकेत राहून

मराठी भाषा नुसती बोलणे नाही तर त्यामध्ये कार्यक्रम सादर करणे ही सोपी गोष्ट नाही. सर्व उपस्थितांनी शाळेतर्फे ठेवलेल्या नाश्त्याचा आस्वाद घेतला आणि कार्यक्रम संपला.

आनंद सुर्वे यांनी काढलेले स्नेहसंमेलनाचे फोटो खालील लिंक वर बघता येतील-

https://goo.gl/photos/ YuAzfYTWUGzRxxHU6

मराठी शाळेसाठी अजून एक महत्वाची बातमी. कॅलिफोर्निया राज्याने मराठी भाषेला "विदेशी भाषा" म्हणून राजमान्यता (Second language accreditation ) द्यावी यासाठी कॅलिफोर्नियाच्या सर्व मराठी शाळांचे प्रयत्न चालू आहेत. त्यामध्ये आपल्या शाळेचा पण सहभाग आहे. या प्रयत्नांना यश आले तर मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शाळेसाठी (high school) मराठी भाषा जोडभाषा (second language) म्हणून घेता येईल. आम्ही सर्व जण याची आतुरतेने वाट बघत आहोत.

शाळेची वार्षिक परीक्षा मे महिन्यात घेण्यात येईल.

मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांची पुढच्या वर्षीची नावनोंदणी मे महिन्यात चालू होईल. शाळेचे पुढील शैक्षणिक वर्ष ऑगस्ट मध्ये सुरु होईल. गेल्या काही वर्षांप्रमाणेच मराठी मंडळ, पालक आणि शिक्षक यांचे सहकार्य आणि प्रोत्साहन शाळा उपक्रमाला मिळावे ही आशा आहे.

मराठी शाळेसंबंधी माहिती साठी संपर्क -

mmsac.shala@gmail.com

धन्यवाद

अमिता खरे , पल्लवी सावंत

# पुनर्जन्मावरील असलेला भारतीयांचा पूर्ण विश्वास

देवदूत गॅब्रियल परमेश्वराकडे गार्हाणे घेऊन येतो. "मला थोडे आपल्याशी बोलायचे आहे. आपल्या स्वर्गात काही भारतीय आहेत. ते मला फारच अडचणी निर्माण करीत आहेत. इथल्या मोत्यानी वेढलेल्या कमानीवर ते झोके घेतात. माझ्या दोन शिंगांपैकी एक शिंग कोठेतरी गायब झाले आहे. त्यांना दिलेल्या सफेद गाऊन ऐवजी ते चुडीदार व गरबा साड्या नेसतात. ते रथाऐवजी मर्सिडीज आणि बीएमडब्ल्यु मधून सतत हिंडतात. त्यांना दिलेले नांगर ते इतरांना सवलतीच्या किमतीत विकत आहेत. स्वर्गात येण्याचा रस्ता मोकळा व स्वच्छ ठेवण्याचे चक्क नाकारतात. त्याऐवजी तो रस्ता ते मध्येच अडवून ठेवतात. रस्त्यातच ते सामोसे खातात आणि एकसारखा चहा पितात. काही जण त्यांच्या फक्त अकाच पंखाने चालतात. कोणतीही शिस्त पाळणे हे त्यांना मान्यच नाही. कोठेही रांग मोडून ते घुसघोरी करत असतात."

त्यावर परमेश्वर म्हणाला, "भारतीय हे वेगळेच आहेत. माझा स्वर्ग हा माझ्या सर्व लेकरांना समान आहे. जर तुला खर्या अडचणी जाणून ग्यायच्या असतील तर तू सैतानाशी बोलून घे. "

सैतान फोनवर बोलतो,"हॅलो, मी नरकातून बोलतो आहे. एक मिनीट होल्ड करा." एक मिनिटानंतर सैतान परत फोनवर येतो. "बोला, मी आलो आहे. मी तुमच्यासाठी काय करू शकतो?"

गॅब्रियल,"तुला कशा प्रकारच्या अडचणीना खाली नरकात तोंड द्यावे लागत आहे ते मी जाणू इच्छितो."सैतान,"जरा थांब मला काही गोष्टीमध्ये लगेच लक्ष घालणे आवश्यक आहे. आलोच मी"

पाच मिनिटानंतर सैतान परत फोन वर येतो. "मी आता परत आलो आहे. तू परत एकदा तुझा प्रश्न विचार." गॅब्रियल, "तिथे खाली नरकात काय प्रकारच्या अडचणी होत आहेत?"

सैतान," अरे माझा विश्वासच बसत नाही." पुन्हा अचानक सैतान गायब होतो ते पंधरा मिनिटानंतर उगवतो. सैतान, "माफ कर गॅब्रियल, पण हे भारतीय लोक एअर कंडीशनर बसवून नरक राहण्यासाठी सुसह्य करीत आहेत. त्यासाठी ते इथल्या आगीच्या भट्ट्या विझवून टाकत आहेत. खरे तर त्या त्यांना इथे आरामदायक वाटू नये यासाठी केल्या आहेत. ते तांत्रिक दृष्ट्या इतके बुद्धीवान आहेत की ते स्वर्ग आणि नरक यात आणि मी व परमेश्वर यात टेलिफोन आणि टीव्ही सुरू करीत आहेत. त्यांनी इथे सार्वजनिक इंटरनेट सुविधा सुरू केली आहे. त्याचा उपयोग ते ज्या लोकांना त्रास होतो

त्यांच्या तक्रार निवारण्यासाठी करत आहेत. त्यांचा कर्मावर पूर्ण विश्वास असून दुसर्याना पटवून देण्यात ते अतिशय तरबेज आहेत. काही जणांनी येते चहा व भाजी, चना भटुरा, इडली डोसा, सामोसा बर्फी, चकली आणि ढोकळा याचे स्टॉल सुरू केले होते. ते मी ते बंद करायला भाग पाडले. बहुतेकाना घाणीमध्ये राहण्याचे काहीच वाईट व वेगळे वाटत नाही. ते त्याला सरावलेले आहेत. इथे नरकात शोचालय व मुतार्या कमी आहेत. पण त्यांचे त्यावाचून काहीच अडत नाही. त्यासाठी ते सर्व करायला खुली हवा जास्त पसंत करतात.

हे लोक भ्रष्टाचारात वाकबगार आहेत. प्रत्येक जण माझ्या कर्मचार्यांना लाच देऊन विकत गेह्तो. त्यामुळे माझे कर्मचारी ताब्यात ठेवणे मला अशक्य होऊ लागले आहे. ते ज्या पृथ्वीवरून आले आहेत त्यापेक्षा त्यांना नरक जास्त बरा वाटतो त्यामुळे त्याची कशाबद्दलच तक्रार नसते.

मला स्वतःला फार कठीण दिवस आल्यासारखे वाटत आहे. त्यांच्यावर अंकुश ठेवणे हे अवघड काम आहे. यासाठी माझी एक नम्र विनंती आहे.

हे परमेश्वरा, पुनर्जन्माच्या नियमानुसार या भारतीयाना लवकरात लवकर पृथ्वीवर पाठव.

आता लक्षात आले असेल ना जगात फक्त हिंदू धर्माचा पुनर्जन्मावर विश्वास आहे.

संग्राहक व अनुवादक

अरविंद साने




मंत्र श्रमाचा, ध्यास गतीचा
गर्व मराठी संस्कृतीचा
18th BMM Convention
Hosted by Maharashtra Mandal of Detroit
At: Grand Rapids MI
On: July 7 – 9, 2017
PLATINUM SPONSOR
excellence
SHELTERS
Banquet, Business, CME & Uttar Ranga Conferences
on July 6th 2017
Visit us on www.bmm2017.org,
Find us on Facebook BMM2017
Art : Gauri

# अभिप्रेरणा - चालना

एक व्यावसायिक कार्यकारी धंद्यात आलेल्या अपयशाने व त्याच्या वाढलेल्या देण्यामुळे हताश होऊन गेला होता. त्यातून बाहेर पडण्याचा त्याला कोणताच मार्ग सापडत नव्हता. देणेकर्यांचा त्याच्या मागे सतत तगादा लागलेला होता. त्याला उधारीवर माल देणारे व्यापारी वसुलीसाठी त्याच्या दारात सतत हेलपाटे घालीत होते. या अवघड मनस्थितीतच तो एक दिवस एका बागेत शांतपणे एका बाकावर येऊन बसला होता. बसल्या बसल्या हातावर डोके ठेवून विचार करीत होता. यातून काही मार्ग निघून समोर असणार्या दिवाळखोरीतून आपल्याला वाचता येइल का असे विचारचक्र त्याच्या मनात सुरू होते.

अचानक एक अनोळखी वयस्कर गृहस्थ त्याच्या समोर येऊन उभा राहिला होता. "मला वाटते तू कसल्या तरी मोठ्या अडचणीत सापडला आहेस. " तो म्हणाला. त्या व्यावसायिकावर ओढवलेल्या अरिष्टांची हकिगत ऐकल्यानंतर तो गृहस्थ म्हणाला, मला वाटते मी तुला मदत करू शकेन". त्याने त्या व्यावसायिकाला त्याचे नाव विचारून खिशातून एक चेक काढून त्यावर त्याचे नाव लिहून तो त्या व्यायसायिकाच्या हातात जवळ जवळ कोंबला. "हे पैसे घे आणि मला बरोबर एक वर्षानंतर ठीक याच वेळी याच बागेत याच बाकावर येऊन भेट. त्या दिवशी तू मला मी तुला दिलेले पैसे परत करू शकशील अशी मला खात्री आहे. " असे म्हणून जसा तो अचानक आला होता तसाच दिसेनासा झाला.

तो गेल्यावर व्यावसायिक कार्यकारीने हातातील चेक पाहिला तर तो ५००,०००/- डॉलर्सचा होता. त्यावर जॉन डी. ऱोकरफेलर अशी सही केलेली होती. म्हणजे सही करणारा जगातील सर्वात श्रीमंत माणूस होता. "एका फटक्यात मी माझे पैशाचे सगळे प्रश्न मिटवू शकतो" असे त्याच्या लक्षात आले. तरीसुद्धा तो मिळालेला चेक अगदी जरूर पडली तरच वापरायचा असा विचार करून तो तसाच बाजूला तिजोरीत राखून ठेवायचा असे ठरविले. वेळ पडली तर तो चेक आपल्या आधाराला आहे, या विचाराने वयवसायाचे काम अधिक जोमाने करण्याची त्याला मानसिक ताकद मिळाली. त्यामुळे तो त्याचा डबघाईला आलेला व्यवसाय उर्जितावस्थेत आणू शकणार होता. नव्याने निर्माण झालेल्या या आशादायक परिस्थितीमुळे देणेकर्यांबरोबर जास्त खात्रीलायक पद्धतीने बोलणी करू शकला. त्याला हवे तसे व शक्य होणार असेल असे पैसे चुकते करण्याचे वेळापत्रक नक्की करू शकला. त्याच्या सोयिस्कर अटी देणेकर्यांना मान्य करण्यास तयार करू शकला. लवकरच तो त्याच्या उत्पादनाची विक्री वाढवू शकला. तिथून पुढच्या काही महिन्यातच तो त्याच्या डोक्यावरच्या कर्जातून बाहेर पडू शकला. लवकरच तो व्यवसायात नफा मिळवू शकला.

बरोबर एक वर्षानंतर तो त्याच बागेत त्याच वेळी त्याच बाकावर येऊन त्या दिवशी आलेल्या गृहस्थाची वाट पहात बसला. येताना तो न वठवलेला चेक आणायला विसरला नाही. बराच वेळ झाला तरी तो वृद्ध गृहस्थ तिथे आला नाही. व्यावसायिक कार्यकारीने आणखी थोडा वेळ पहाण्याचे ठरविले. काही वेळातच तो गृहस्थ आला पण त्याचे लक्ष त्या व्यावसायिक कार्यकार्याकडे गेले नाही. त्याने केलेल्या मदतीचा चेक त्याला परत करून मागच्या एक वर्षात घडलेल्या

घडामोडी त्याला सांगण्यासाठी म्हणून व्यावसायिकाने त्या वृद्ध गृहस्थाला थांबविले. त्याचे आभार मानून आपल्या यशाची कहणी त्याला सांगण्याची त्याची इच्छा होती. त्याच वेळी त्याच्या पाठोपाठ एक नर्स धावत धावत येऊन तिने त्या वृध्द गृहस्थाला पकडलेच.

"बरे झाले मी  याना  पकडू शकले" रडत रडत ती बोलत होती, "मला आशा आहे की यांनी तुम्हाला काही त्रास दिला नाही. हे नेहमीच माझ्या हातून नर्सिंग होममधून सुटून जातात. जो भेटेल त्याला सांगत सुटतात की, ते जॉन. डी. रॉकलेफेलर आहेत म्हणून." आणि ती त्याच्या दंडाला धरून त्याला ओढतच घेऊन गेली. तो आश्चर्यचकीत होऊन तो गेला त्या वाटेकडे पहात उभा राहिला.  गेले  वर्षभर तो लोकांबरोबर चर्चा करीत, अखंड प्रवास करीत, खरेदी विक्रीचा उच्चांक गाठत होता. त्याच्या सुप्त मनात एकच विचार असायचा की आपल्याला गरज  पडल्यास आपल्या जवळ त्या चेकने मिळालेले पाच लाख डॉलर्स आहेत. एकाएकी त्याचा भ्रमनिरास होऊन त्याला समजले की त्याच्याजवळ असणारा चेक म्हणजे पैसे नव्हते तर ते काल्पनिक पैशाचे पाठबळ होते पण त्यानी त्याचे आयुष्याचे गणितच बदलून टाकले होते. स्वतःबद्दलचा विश्वास त्याला नव्याने सापडला होता. त्या आत्मविश्वासामुळेच तो जे जे करत गेला त्यात त्याला यश प्राप्त करता आले. त्याला कळून चुकले की आत्मविश्वास म्हणजे येणार्या प्रत्येक अडचणीला सामोरे जाताना सकारात्मक दूरदृष्टी ठेवून प्रयत्न करणे हाच मार्ग असतो. हे कोणालाही त्याच्या कामावरील निष्ठा व बांधिलकी यातून प्राप्त होते. तसेच ते सर्वस्वी स्वतःच्या अंतर्गत निश्चयाचे फळ असते.


दुसर्याच्या जगण्याच्या झगडण्यामध्ये त्याला प्रोत्साहित करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असून आणि त्याच वेळी समोर असणार्या आदर्शाप्रती जाण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करणे हे जीवनाचे ध्येय  बाळगावे. - स्वामी विवेकानंद

संग्राहक व अनुवादक

अरविंद साने



# आगामी कार्यक्रम


MMSAC 2017-18 Events
Saleel Show: June 2nd
Picnic: June 24th
Camping: July 28-30th
Ganapati: August 27th
Kojagiri: October 7th
Diwali: November 4th
Sankranti & AGM: January 14th

# मागील कार्यक्रमांची प्रकाशचित्रे तुम्हाला खालील दुव्यांवर पाहता येतीलः

## रंगपंचमी

फोटो सौजन्य : आनंद सुर्वे

https://goo.gl/photos/YZAXz9qCW5KpXjNb8

फोटो सौजन्य : केतन चौधरी

https://goo.gl/photos/VRm25CgZeCdjZPM16

## नाटक - "तीन पायांची शर्यत"

फोटो सौजन्य : राजेश परब

https://photos.google.com/album/AF1QipNV9P0mYT0O2mPlaFwHVU0nO_khFYv0ZpP69dsa

https://photos.google.com/album/AF1QipNZ1lHQ19_T06MbcG30ZXJRuHaVhKTwT_cV8066

फोटो सौजन्य: विक्रांत सावंत

https://photos.google.com/album/AF1QipO2LvrweeD9H-sjshuNrdK4Ayo5ZcEme7wC1WfQ

|| मराठी मंडळ सॅक्रामेंटो ||

Marathi Mandal Sacramento (MMSac), Sacramento, CA, USA (Established 2005)

## Visit us at

## www.mmsac.org

Like us on Facebook

## Contact us at

## Committee@mmsac.org